महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २२४ वे दिनांक : ०९/०८/२०२६ वार : रविवार

## उद्धव ठाकरे म्हणजे 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना नरेश म्हस्केंची बोचरी टीका



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत सत्ताधारी पक्षांवर तसेच शिंदे गटावर सडकून टीका केली. त्यानंतर आता शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाकरेंवर पलटवार केला आहे. ते म्हणाले, उद्धव ठाकरे आज पुन्हा एकदा मीडियासमोर रडले आहेत. रुदाली हिंदी चित्रपट आपण पाहिला असेल, ज्या पद्धतीने काही लोक खास रडण्यासाठी असतात, त्या पद्धतीने त्यांचा रुदाली झाला असल्याची टीका म्हस्के यांनी केली आहे.

नरेश म्हस्के म्हणाले, सुप्रीम कोर्टाच्या कामकाजावर अविश्वास दाखवण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या जनतेला माहिती आहे की ते रडण्याचे काम करतात. रुदाली हा शब्दप्रयोग त्यांना अगदी चपखल बसतो आणि त्याच पद्धतीने अशी त्यांची वक्तव्य आहेत.

पुढे बोलताना नरेश म्हस्के म्हणाले, अभिजीत दिपके यांचे आंदोलन झाले त्याला साथ कोणी दिली? या देशातील तरुणांनी दिली. उद्धव ठाकरे म्हणजे 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' अशा पद्धतीने ही मंडळी त्या आंदोलनाचा भाग्यविधात स्वत:ला क्रेडिट घेऊ इच्छितात. काही लग्नांमध्ये त्यांच्या आनंदामध्ये वरातीमध्ये नाचण्याकरता भाड्याने माणसं आणली जातात अशाच पद्धतीचे काम उद्धव ठाकरे आणि त्यांचे युबीटी पक्ष करत आहेत, अशी बोचरी टीका म्हस्के यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पद्धतीने देशाचा काम करतायेत त्यांची बरोबर हे करु शकतात का? असा सवाल नरेश म्हस्के यांनी केला आहे. ते म्हणाले, त्यांना ज्यावेळेस संधी दिली होती त्यावेळेस त्यांनी काही नाही केले. मोदीजी 24 तास काम करत आहेत. तुम्ही काय केले? मुख्यमंत्र्यांच्या दालनात देखील जात नव्हते, त्यामुळे उद्धव ठाकरेंना नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करण्याचा अधिकार नाही. उद्धव ठाकरे यांनी हिंदूहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी केली. कॉंग्रेस बरोबर संगत करून खुर्चीसाठी गद्दारी करून कॉंग्रेससोबत घरोबा केला, यालाच गद्दारी म्हणतात, अशी टीका म्हस्के यांनी केली.

दरम्यान, ठाणे शहरासह जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि तरुणांमध्ये ड्रग्जच्या व्यसनाचे प्रमाण वेगाने वाढत असून, या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे. आयुक्तांच्या कामकाजाचे कौतुक करतानाच म्हस्के यांनी स्पष्ट केले की, त्यांनी गेल्या आठवड्यात पोलिस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांची भेट घेऊन शाळा-कॉलेज परिसरातील वस्त्यांमध्ये सर्रासपणे सुरू असलेल्या ड्रग्ज विक्रीची सविस्तर माहिती त्यांना दिली आहे.

संपूर्ण ठाणे जिल्ह्याला मुंब्रा परिसरातून ड्रग्जचा पुरवठा होत असल्याची चर्चा असली तरी, केवळ एकाच भागापुरते मर्यादित न राहता मुंब्रा पोलिसांसह सर्वच यंत्रणांनी या रॅकेटच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून प्रत्येक पोलीस ठाण्याला ड्रग्ज माफियांच्या मुळावर घाव घालून लवकरात लवकर कठोर कारवाई करण्याचे सक्त आदेश द्यावेत, अशी आग्रही मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे.

## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

## सुप्रिया सुळेंची पंतप्रधानांशी भेट; कर्जमाफीवर सरकारला घेरले

**मुंबई :** "आम्ही महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी आणि विकासकामांसाठी रीतसर वेळ मागून देशाच्या पंतप्रधानांची भेट घेणार आहोत. ते केवळ एका पक्षाचे पंतप्रधान नाहीत, तर संपूर्ण देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीचे फोटोही आम्ही तुम्हाला नक्की देऊ," असा टोला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी लगावला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना सुळे यांनी केंद्र सरकारचे फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट (FCRA) बिल, नीट परीक्षा वाद, महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी आणि 'जेन झी' आंदोलनावर सरकारला धारेवर धरले.

**उप**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या खासदारांनी नुकतीच पंतप्रधानांची भेट घेतली, यावर सुप्रिया सुळे यांनी भाष्य केले. “पंतप्रधान हे सगळ्या पक्षांच्या खासदारांना नियमितपणे भेटतात. आम्हीही लोकप्रतिनिधी म्हणून आमच्या मतदारसंघातील आणि महाराष्ट्राच्या विकासाच्या कामांसाठी अधिकृतपणे सकाळी 11 वाजता पंतप्रधानांची भेट घेणार आहोत. ते देशाचे पंतप्रधान आहेत, त्यामुळे त्यांना भेटून राज्याचे प्रश्न मांडणे हा आमचा अधिकार आहे.”

केंद्र सरकारच्या नवीन 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट' (FCRA) बिलावर सुप्रिया सुळे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. त्या म्हणाल्या, "सध्या ज्या स्वरूपात हे बिल आणले जात आहे, त्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा स्पष्ट विरोध आहे. आमची सरकारला विनम्र विनंती आहे की हे बिल घाईघाईत मंजूर करू नका, ते मागे घ्या. जर तुम्हाला ते मागे घ्यायचे नसेल, तर ते जॉईंट पार्लमेंटरी कमिटीकडे (JPC) पाठवा. तिथे सर्व पक्षांचे नेते एकत्र बसून यावर चर्चा करतील. ड्रग मनी किंवा टेररिस्ट मनी असेल तर नक्कीच कारवाई करा, पण जर परदेशातून गरीब मुलांच्या शिक्षणासाठी किंवा पोलियो इंजेक्शनसाठी निधी येत असेल, तर त्याला डर्टी मनी कसे म्हणता येईल? परदेशी निधीकडे नेहमी संशयाने आणि वाईट नजरेने पाहणे चुकीचे आहे."

"विद्यार्थ्यांच्या नीट परीक्षेच्या गोंधळाबाबत आणि जंतर-मंतरवर आंदोलकांवर झालेल्या पॅलेट गनच्या हल्ल्याबाबत सत्य बाहेर आले पाहिजे. संसदेचे दरवाजे बंद करून आणि अश्रुधुराचा वापर करून आंदोलन कसे दडपले गेले, याची पारदर्शक 'एसआयटी' चौकशी झाली पाहिजे," अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेत 12 लाख शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे वगळले गेल्याच्या मुद्द्यावर सुळे यांनी राज्य सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला. "कर्जमाफीबाबत या सरकारचा असंवेदनशीलपणा पाहून मला धक्का बसला आहे. लाडकी बहीण योजना आणि कर्जमाफी योजनेचे टायमिंग बघा. जेव्हा निवडणुका येतात, तेव्हा हे सरकार दोन्ही हातांनी सवलतींचे निर्णय घेते; पण निवडणुका संपल्या की हात आखडते घेतात. देशासाठी इमान राखणाऱ्या शेतकऱ्याला कर्जमाफी देताना किचकट नियम आणि अटी का लादल्या जातात? पेपर फुटीच्या वेळी मात्र सरकारला कोणतेच नियम आठवत नाहीत."

देशभरात तरुणांनी पुकारलेल्या 'जेन झी' आंदोलनाचे समर्थन करताना त्या म्हणाल्या, "या सुशिक्षित आणि तरुण पिढीला ना सीबीआय (CBI) ची भीती आहे, ना इडी (ED) ची. त्यांना कुठलेही मोठे कॉन्ट्रॅक्ट नको आहे. ते संविधानाने दिलेल्या अधिकाराने केवळ आपला हक्क मागत आहेत. सरसंघचालक मोहन भागवत यांनी या नवीन पिढीचे कौतुक करून त्यांना 'इमानदार' म्हटले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. भागवतांनी तरुणांना दिलेले हे प्रमाणपत्र भाजपने ऐकले, तर मला जास्त समाधान वाटेल. जर सरकारने या तरुणांचा आवाज असाच दाबला, तर हे तरुण लवकरच सरकारला 'चले जाव'चा इशारा देतील."

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६


# डॉ. नंदकुमार राठी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या तर अनेकांनी दूरध्वनी, व्हाट्सअप आणि इतर समाज माध्यमातून त्यांना वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्याच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. यात प्रामुख्याने परंडा आमदार राहुल मोटे मातोश्री डॉक्टर कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाचे प्राचार्य तथा दैनिक महाराष्ट्र जनशक्ती आणि एमजे न्यूज चॅनल चे मुख्य संपादक डॉ. हसन इनामदार, डी एफ सी चे संचालक गोविंद काबरा, अद्वैता एज्युकेअर च्या संस्थापिका आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आभा काबरा माजी कुलसचिव दिलीप भरड तसेच छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्रातील सर्व अधिकारी कर्मचारी यांचा समावेश आहे


आमदार राहुल मोटे आणि सहकारी


आभा काबरा आणि गोविंद काबरा


प्राचार्य डॉ. हसन इनामदार शुभेच्छा देताना


विभागीय कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

# जात प्रमाणपत्रांवरून नरेंद्र पाटील भडकले, आंदोलनाचा इशारा



**बीड :** मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला यश येऊन मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून कुणबी जात प्रमाणपत्रे मिळू लागल्याने बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण होते. परंतु आता जात वैधता प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करणे आणि काहींची मिळालेली प्रमाणपत्रे थेट रद्द करण्याच्या प्रकारांमुळे नवा वाद उफाळून आला आहे. या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला थेट धारेवर धरले असतानाच, आता अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनीही प्रशासकीय यंत्रणेला लक्ष्य केले आहे. जात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत काही अधिकारी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करत असून, काही जण स्वतःचा 'अतिहुशारपणा' दाखवून अडवणूक करत असल्याचा घणाघात नरेंद्र पाटील यांनी अधिकाऱ्यांवर केला आहे. जात प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करत असून, काही जण स्वतःला 'अतिहुशार' समजत असल्याची जळजळीत टीका त्यांनी केली. विशेषतः महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून लादल्या जाणाऱ्या जाचक अटी आणि शर्तींवर पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित अधिकारी स्वतः मराठा समाजाचे असूनही अशा अटी का लादत आहेत, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या प्रशासकीय आडमुठेपणाबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा दावा नरेंद्र पाटील यांनी केला आहे. अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभारामुळे मराठा समाजातील तरुणांचे मोठे नुकसान होत असून, हे असेच सुरू राहिल्यास मराठा तरुणांना एकत्रित करून सरकारविरोधात तीव्र आंदोलन उभारण्याचा थेट इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला आहे. २०२५ मध्ये प्रमाणपत्र मिळवून महामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेक तरुणांना कागदपत्रे अपलोड करता न आल्याने ते लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली असून, याबाबत अनेक तरुणांनी आपल्याशी संपर्क साधल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या या आडमुठ्या निर्णयांविरोधात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ उपसमितीकडे वारंवार लेखी तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने पाटील यांनी आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या प्रश्नावर तरुणांना संघटित करून जनजागृती करण्यासाठी त्यांनी मराठवाड्याचा दौरा सुरू केला असून, 'जोपर्यंत आपण सर्वजण एकत्र येणार नाही, तोपर्यंत सरकारला आपला आक्रोश समजणार नाही,' अशी ठाम भूमिका घेत त्यांनी तीव्र आंदोलनाची पूर्वतयारी सुरू केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६

## उमरगा येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा 'करिअर कट्टा - विद्यार्थी दीक्षारंभ कार्यक्रम' उत्साहात संपन्न



**उमरगा :** भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा – विद्यार्थी दीक्षारंभ कार्यक्रम' उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. विनोद देवरकर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले (प्राचार्य प्रवर्तक धाराशिव जिल्हा करिअर कट्टा) यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा उपक्रमाचे उद्दिष्ट, स्पर्धा परीक्षांची तयारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतेच्या संधी तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात स्वतःचा सर्वांगीण विकास कसा साधावा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. याबरोबरच करिअर कट्ट्या अंतर्गत वर्षभर राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती देत त्यातून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास साधून घ्यावा असे आव्हान केले.यावेळी व्यासपीठावर कला शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे,व प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले, उमरगा तालुका समन्वयक करिअर कट्टा, यांच्यासह विभागप्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापिका आणि विद्यार्थी , करिअर संसदेतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर संसद मुख्यमंत्री कु. पूजा हांडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रियंका इंगळे यांनी केले, तर आभार गणेश मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. विनोद देवरकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. करिअर कट्टा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच स्पर्धा परीक्षा, रोजगार व उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये विकसित होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक डॉ. चंद्रसेन करे, डॉ.अर्जुन कटके, डॉ. राम जाधव यांनी प्रयत्न केले.

## बीडच्या शाळेत अय्युब पठाण यांचा सत्कार



*छायाचित्र : बीड येथील इंदिरा गांधी प्राथमिक व माध्यमिक शाळेत अय्युब पठाण यांचा सत्कार करताना मुख्याध्यापक टेकाळे व विक्रमजी काळेसाहेब आणि संस्थाचालक दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** स्व. अजित दादापवार यांच्या प्रथम जयंती निमित्ताने बीड येथील सात शाळेत लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बीड येथील सात शाळेमध्ये लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमांतर्गत लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा बीड येथील प्रत्येक सात शाळेमध्ये शाल,श्रीफळ, पुष्पहार, बुके देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला आहे. याप्रसंगी मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळे, बीड येथील रवींद्र खोड,नवनाथ मात्रे, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील पदाधिकारी प्रदीप विखे, कवी मनोज खुटे, विपुलजी काळे,महेश घरत,मुदस्सर पठाण आणि शाळेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षिका विद्यार्थी हे मोठ्या संख्येने सत्काराच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## चाळीसगाव येथील मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचा समारोप, साठ प्रशिक्षणार्थींनी घेतले प्रशिक्षण



**कन्नड (अरुण थोरात) :** नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव तसेच पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 30 जुलै ते 8 ऑगस्ट या काळात मोडी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते दि.08 ऑगस्ट रोजी या शिक्षण वर्गाचा समारोप झाला. समारोप कार्यक्रमाला शैलेंद्र वाघ अभिलेख अधिकारी पुराभिलेख संचालनालय पुणे हे अध्यक्ष म्हणून लाभले. तसेच मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.डी देशमुख, सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्राचार्य बाळासाहेब विश्वासराव चव्हाण, मोडी प्रशिक्षक अमोल मोहोळकर, भरत गवळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम. एस बेलदार, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य तथा इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस पाडवी व माजी प्राचार्य बाविस्कर उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी दहा दिवसाच्या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक या उपक्रमाचे समन्वयक प्रा. कल्पतेश देशमुख यांनी केले. प्रास्ताविकात 10 दिवसीय मोडी प्रशिक्षणाचा अनुभव तसेच भविष्याच्या वाटचाली संदर्भात मांडणी करण्यात आली. तर दहा दिवसीय शिबिराचे अहवाल वाचन इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. पी. एस पाडवी यांनी केले. अहवाल वाचनात त्यांनी प्रत्येक दिवशी झालेल्या कृती कार्यक्रमाचा आराखडाच मांडला. तसेच सांस्कृतिक कार्य विभाग व पुराभिलेख संचालनालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या मोडी विविध पत्रांचे प्रदर्शन या कार्यक्रमाचा अहवाल देखील मांडला. समारोपीय कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थी पैकी प्रतिनिधी स्वरूपात मनोगते झाली. मनोगतात कु. तनुजा पाटील, शुभम गरुड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या मोडी प्रशिक्षणामुळे मोडी लिहिणे व वाचणे या गोष्टी योग्य पद्धतीने समजल्या भविष्यात मोडी लिपी संबंधित अभ्यास जोमाने करू तसेच इतिहासाशी संबंधित विविध क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा उत्पन्न झाल्याचे विद्यार्थ्यांनी यावेळेस बोलून दाखवले. मोडी लिपी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून आलेले अमोल मोहोळकर त्यांनी आपल्या मनोगतात मोडी लिपी प्रशिक्षण शिबिर यशस्वी झाल्याचे जाहीर केले. मागील दहा दिवसात अध्यापना दरम्यान त्यांना आलेले सुखद अनुभव त्यांनी आपला मनोगत आतून मांडले. राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आबासाहेब बाळासाहेब विश्वासराव चव्हाण यांनी आपल्या मनोगतात मोडी प्रशिक्षण वर्गाबाबत समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणापुरता न थांबता नियमित स्वरूपात मोडीचा लिखाणाचा व वाचनाचा सराव करावा व या सरावाच्या माध्यमातून दुर्लक्षित राहिलेल्या कागदपत्रांना संशोधनाच्या माध्यमातून प्रकाशात आणावे व इतिहासाचा नवा आयाम समाजासमोर ठेवावा. ही जबाबदारी सर्व प्रशिक्षणार्थींची आहे अशी अपेक्षा व्यक्त केली. महाविद्यालयाच्या आयोजना संदर्भात कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शैलेंद्र वाघ यांनी आपल्या मनोगतामध्ये पुराभिलेख संचालनालय यांच्यामार्फत मोडी लिपीच्या संवर्धनासाठी केल्या जाणाऱ्या विविध प्रयत्नांची माहिती दिली. तसेच भाषा संचालनालय यांच्यामार्फत होणारे उपक्रमांची देखील माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मोडी लिपी वाचणे लिहिणे याचा सराव करावा. भविष्यात त्यांना या संदर्भात चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. असा आशावाद त्यांनी यावेळेस व्यक्त केला. तसेच या मोडी प्रशिक्षणासंदर्भात समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ जाधव व गायत्री गोसावी यांनी केले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इतिहास विभागाचे प्रा. कल्पतेश देशमुख यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.डी देशमुख उपप्राचार्य डॉ. पी एस पाडवी उप प्राचार्य एम. एस. बेलदार यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंग्रजी विभागाचे प्रा. आदर्श मिसाळ, प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. अभिजीत चव्हाण व वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. रत्नाकर मोरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व सर्व कार्यालयीन बांधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६


## आसेगाव येथे दौलताबाद पोलिसांचा छापा; १८०८ ग्रॅम गांजासह एकाला अटक



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद पोलिसांची कारवाही आसेगाव येथे छापा टाकून १८०८ ग्राम जाण्यासह एकाला अटक दिनांक ४ रोजी संध्याकाळी ६:१५ बाजेच्या सुमारास दौलताबाद पोलिसांनी आसेगाव ता.गंगापूर जी छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक १६० मधील एक पत्र्याच्या शेड मध्ये छापा टाकून १८०८ ग्राम गांजा अंदाजे किंमत ९० हजार रुपये व वजन काटा २००० रुपये असा एकूण ९२००० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून सोनू राजू पवार वय ३१ राहणार आसेगाव ता. गंगापुर, जी. छत्रपती संभाजीनगर यास अटक केले पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखैर यांना गुप्त बातमी दाराकडून माहिती मिळाली की आसेगाव येथे गट क्रमांक १६० मधील पत्र्याच्या शेडमध्ये अवैध रित्या गांजा विक्री करण्यात येत आहे माहिती मिळताच पोलिस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी कायद्याची पूर्तता करत सदर ठिकाणी छापा मारून १८०८ ग्राम गांजा ९० हजार रुपये व वजन काटा २००० हजार रुपये असे एकूण ९२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल व सोनू पवार या आरोपीला अटक केले सदर कार्यवाही पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे,उप निरीक्षक अजित दगडखैर,पोलिस अंमलदार खुशाल पाटील, बंडु गोरे,अविनाश बरवंट,सुमेध पवार,कल्पना जगताप,साईनाथ सोनवणे यांनी केली पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे,उप निरीक्षक अयुब पठाण,सुनील पठारे करीत आहे.

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा गझल संवाद कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** ज्येष्ठ गझल गायक,संगीतकार,गझलनवाज भीमराव पांचाळे ह्यांचा गझल संवाद कार्यक्रम रविवार दिनांक 9 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 11:30 वाजता टिळक नगर येथील,जीवन विकास ग्रंथालयाच्या,गंथमित्र भा.बा.आर्विकर सभागृहात आयोजित केला आहे.गझल लेखन,गझल रसास्वाद,गझल कशी गावी,गझलेचे बारकावे,गझलेला चाल कशी सुचते, गझल गायकीचा प्रवास उलगडणार आहेत.एकंदरीत आपल्याला गझल तृप्त करणारी अशी ही मैफल असेल.यावेळी श्री प्रफुल्ल कुलकर्णी,ज्येष्ठ गझलकार ,पुणे .श्री. सुशील बनसोडे , कार्यक्रम विभाग प्रमुख,केंद्रप्रमुख, आकाशवाणी संभाजीनगर आणि डॉ राज शेखर बालेकर,कार्यवाह जीवन विकास ग्रंथालय ह्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.कार्यक्रमाचे आयोजन ध्यास गझल साहित्य समूह,जीवन विकास ग्रंथालय,आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर आणि न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस,पुणे यांनी संयुक्त विद्यमाने केले आहे.हा कार्यक्रम गझल रसिकांसाठी मोफत आहे.तरी सर्व श्रोत्यांनी ह्या गझलसंवाद कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन गिरिश जोशी ह्यांनी केले आहे.संपर्क 9226750621

## पीएचडी विभागाच्या उपकुलसचिवपदी भगवान फड



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील परीक्षा विभागातील सहाय्य कुलसचिव भगवान नारायणराव फड यांची उपकुलसचिवपदी पदोन्नती करण्यात आली आहे.मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या आदेशाने ही पदोन्नती करण्यात आली. भगवान फड हे गेल्या २२ वर्षापासून विद्यापीठात कार्यरत आहेत. या काळात त्यांनी टंकलेखक, लिपीक, वरिष्ठ सहायक, कक्षाधिकारी, सहायक कुलसचिव आदी पदांवर कार्य केले आहे. कृष्णा दाभाडे यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या उपकुलसचिवपदी त्यांची पदोन्नतीने नियुक्ती आली. पीएचडी विभागाचे उपकुलसचिव म्हणून भगवान फड हे काम करणार आहेत.

## राज्यस्तरीय तिफण लेखक वाचक मेळाव्याच्या अध्यक्षपदी उत्तम बावस्कर



**कन्नड :** त्रैमासिक तिफण ,तिफण वाचक चळवळ आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जामुवंतगड ता. अंबड जि. जालना येथे ऑगस्टच्या तिसऱ्या रविवारी होणाऱ्या राज्यस्तरीय तिफण लेखक वाचक मेळाव्याच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक उत्तम बावस्कर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली.श्री. बावस्कर हे जालना जिल्ह्यातील हिसोडा गावचे रहिवासी आहेत. 1980 पासून ते सातत्याने कविता, कथा आणि कादंबरी लेखन करत आहेत. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण , काव्यात्मक भाषा आणि सूक्ष्म मनोविश्लेषण ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.त्यांचे विद्रोह, हिरवी पहाट हे कविता संग्रह, बुजगावनं, इस्कोट, टंचाई हे कथा संग्रह, काळवाटा ही कादंबरी आणि साहित्यास्वाद हे समीक्षात्मक पुस्तक प्रकाशित आहेत.बुजगावनं या कथासंग्रहाला यशवंतराव चव्हाण, ग. ल. ठोकळ आणि महात्मा फुले पुरस्कार मिळाले आहेत. तर हिरवी पहाट आणि काळवाटा या पुस्तकांसाठी त्यांना भि. ग. रोहमारे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे इस्कोट आणि काळवाटा हे मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.मेळाव्याच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. विजय भोसले,संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, स्वागताध्यक्ष कल्याणराव खडके, तिफण लेखक वाचक चळवळचे अध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, कार्याध्यक्ष डॉ. रामचंद्र झाडे, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव,डॉ. संतोष चव्हाण, डॉ. दत्तात्रेय डुंबरे, डॉ. मारोती घुगे, नारायण खरात,डॉ. यशवंत सोनुने, अशोक डोरले, डॉ. एकनाथ शिंदे, डॉ. सत्यशिला तौर , सुनील डोके यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603 , 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.


Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६

## कृषीतज्ज्ञ डॉ. ज. त्र्यं. नानकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यापीठाकडून सुवर्णपदक जाहीर



**परभणी** : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या वतीने जागतिक कीर्तीचे कृषितज्ज्ञ डॉ. जगन्नाथ त्र्यंबक नानकर यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या व त्यांच्या पत्नी स्व. वत्सला जगन्नाथ नानकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदक सुरू करण्यात आले आहे. या सुवर्णपदकासाठी विद्यापीठातील कृषीविद्या विभागातील आचार्य (Ph.D.) पदवी प्राप्त विद्यार्थ्यांपैकी सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या एका गुणवंत विद्यार्थ्याची दरवर्षी निवड करण्यात येणार असून, विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे, असे विद्यापीठाचे कुलसचिव पु. कों. काळे यांनी कळविले आहे. डॉ. नानकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू करण्यात आलेले हे सुवर्णपदक म्हणजे केवळ त्यांच्या कार्याचा सन्मान नसून कृषीविद्या विषयातील संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारा उपक्रम आहे. दरवर्षी कृषीविद्या विषयातील आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थ्यांमधून सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्याला हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार असल्याने, डॉ. नानकर यांच्या कृषी संशोधन व शिक्षण क्षेत्रातील आदर्श कार्याची प्रेरणा भावी कृषी शास्त्रज्ञांपर्यंत पोहोचणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथील मूळ रहिवाशी स्वर्गीय डॉ. जगन्नाथ त्र्यंबक नानकर आणि स्व. वत्सला जगन्नाथ नानकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू करण्यात आलेले हे सुवर्णपदक त्यांच्या कार्याचा आणि कृषी क्षेत्रावरील त्यांच्या योगदानाचा चिरस्थायी गौरव ठरणार आहे. पूर्वहंगामी ऊसामध्ये बटाटा आंतरपीक तंत्रज्ञानाच्या संशोधन, प्रचार व प्रसारामध्ये स्वर्गीय डॉ. नानकर यांनी मोलाचे योगदान दिले होते. मराठवाड्यातील कृषीतज्ज्ञ म्हणून ख्यातीप्राप्त डॉ. नानकर यांच्या कार्याचा जागतिक स्तरावरही सन्मान झाला होता. चौकट १ -कृषी संशोधन व प्रसारातील उल्लेखनीय कार्यडॉ. जगन्नाथ त्र्यंबक नानकर यांनी मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे प्रमुख, कृषीविद्या विभाग म्हणून कार्य केले. त्यानंतर त्यांनी असोसिएट डायरेक्टर ऑफ रिसर्च, औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर) या पदावर NARP प्रकल्पांतर्गत कार्य केले. पूर्वहंगामी ऊसामध्ये बटाट्याचे आंतरपीक घेण्याच्या तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसारामध्ये डॉ. नानकर यांचे विशेष योगदान होते. विविध शेतकरी मेळावे आणि कृषी कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन त्यांनी शेतकऱ्यांना या तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. ऊस पिकाच्या सुरुवातीच्या कालावधीत उपलब्ध जागेचा उपयोग करून बटाट्याचे अतिरिक्त उत्पादन घेण्याची संकल्पना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. चौकट २ - कृषी तंत्रज्ञानाचा पश्चिम महाराष्ट्रात व्यापक विस्तारडॉ. नानकर यांच्या कार्याला पुढील काळात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या माध्यमातून व्यापक स्वरूप प्राप्त झाले. विद्यापीठातील प्रमुख शास्त्रज्ञ, बियाणे व प्रमुख, कृषीविद्या विभाग डॉ. आनंद विठ्ठलराव सोळंके यांनी RKVY प्रकल्पांतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये पूर्वहंगामी ऊसामध्ये बटाटा आंतरपीक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार केला.या प्रकल्पांतर्गत हजारो एकर क्षेत्रावर प्रत्यक्ष ऊसामध्ये बटाटा आंतरपीक घेण्यात आले. संशोधनातून विकसित झालेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून त्याचा स्वीकार वाढविण्यात आला. चौकट ३- संशोधनापासून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंतडॉ. नानकर यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे कृषी संशोधनाचा प्रत्यक्ष शेतकऱ्यांना उपयोग करून देण्यावर त्यांनी दिलेला भर. संशोधन, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे आणि तांत्रिक मार्गदर्शन यांच्या माध्यमातून ऊस-बटाटा आंतरपीक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात आला. त्यांच्या कार्याचा पुढे विस्तार होत पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये RKVY प्रकल्पाच्या माध्यमातून मोठ्या क्षेत्रावर हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष राबविण्यात आले. त्यामुळे एकाच क्षेत्रातून ऊसाबरोबर बटाट्याचे अतिरिक्त उत्पादन घेण्याची संधी शेतकऱ्यांना मिळाली.

## विद्युत शॉक लागून एक जणांचा मृत्यु

**दौलताबाद (जावेद अहेमद)** : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि ०७ शुक्रवारी अब्दीमंडी दौलताबाद येथील कोहिनुर व्हीला येथे आसिफ बिस्मिल्ला पठाण वय ४३ वर्ष राहणार शहानुरवाडी छत्रपती संभाजी नगरयांना विद्युत शॉक लागल्याने बेशुद्ध अवस्थेत कामरान पठाण ,बाबर पठाण यांनी उस्मानपुरा येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले अधिक उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल केले वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून आसिफ पठाण यांना मयत घोषित केलेविद्युत शॉक कश्यामुळे लागले हे अजून कळले नाहीया घटनेची नोंद दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहे

## अमरनाथ यात्रा २० दिवस आधी थांबवली



**श्रीनगर** : बाबा अमरनाथची यात्रा नियोजित वेळेच्या २० दिवस आधी थांबवण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे आणि भूस्खलनामुळे रस्ते खराब झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

आता जे गट यात्रेवर आहेत, त्यांचीच यात्रा पूर्ण केली जाईल. नवीन गट पाठवले जाणार नाहीत. आतापर्यंत ४.८ लाखांहून अधिक भाविकांनी पवित्र गुहेचे दर्शन घेतले आहे.

काश्मीरचे विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी सांगितले की, आयएमडीने पुढील काही दिवसांत खराब हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करून ९ ऑगस्टपासून दोन्ही मार्गांवर यात्रा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यात्रा ९ ऑगस्टपासून भाविकांसाठी बंद होईल, तरीही पारंपरिक छडी मुबारक कार्यक्रमासोबत तिचा धार्मिक समारोप होईल. पवित्र छडी २८ ऑगस्ट रोजी पारंपरिक पहलगाम मार्गाने अमरनाथ गुहेपर्यंत जाईल आणि याचसोबत अमरनाथ यात्रा-२०२६ चा औपचारिक समारोप होईल.

२३ मे रोजी BSF जवानांनी जारी केलेल्या फोटोमध्ये शिवलिंगाचा आकार सुमारे ७ फूट होता. २९ जून रोजी पहिल्या पूजेच्या दिवशीही हिमलिंगाची उंची ५ फुटांपेक्षा जास्त होती. ६ जुलै रोजी समोर आलेल्या फोटोमध्ये हिमलिंग जवळपास ९०% गायब झाले होते. त्यानंतर ७ जुलै रोजी हिमलिंग पूर्णपणे गायब झाले. तरीही यात्रा सुरूच राहिली.अमरनाथचे हिम शिवलिंग कोणत्याही बर्फाच्या ब्लॉकला कोरून बनवले जात नाही, तर ते नैसर्गिक आइस स्टॅलेग्माइट आहे. ज्याप्रमाणे चुनखडीच्या गुहांमध्ये जमिनीतून खनिजे जमा होऊन स्टॅलेग्माइट्स तयार होतात, त्याचप्रमाणे अमरनाथ गुहेत छतातून ठिबकणारे पाणी गोठून बर्फाचे शिवलिंग तयार होते. याचा आकार दरवर्षी हवामान, तापमान आणि पाण्याची उपलब्धता यानुसार वेगवेगळा असतो. हेच त्याचे सर्वात अनोखे वैशिष्ट्य आहे.

अमरनाथ यात्रा दोन मार्गांनी केली जाते. पारंपारिक मार्ग ४८ किलोमीटर लांब नुनवान-पहलगाम येथून आहे. दुसरा मार्ग गांदरबल जिल्ह्यात १४ किलोमीटर लांब बालटाल येथून आहे. यात्रा २८ ऑगस्ट रोजी संपणार होती.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६

## पदवीच्या पलीकडेही एक मोठे जग आहे; बदलत्या जगासोबत स्वत:ला घडवा : पत्रकार राजेंद्र हुंजे



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** "पदवी आणि मेडल हे यशाचे अंतिम टप्पे नसून, पदवीच्या पलीकडेही एक मोठे जग आहे. बदलत्या काळासोबत स्वत:ला सतत अद्ययावत ठेवत रोज काहीतरी नवीन शिकण्याची जिद्द विद्यार्थ्यांनी बाळगली पाहिजे," असे प्रतिपादन पत्रकार मा. राजेंद्र हुंजे यांनी केले.श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पत्रकार मा. राजेंद्र हुंजे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते, तर भारत शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. विजय पाटील हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना राजेंद्र हुंजे म्हणाले की, "आयुष्याच्या प्रत्येक वळणावर एक गुरु भेटला पाहिजे. जीवनात अडचणी आणि संघर्ष भरपूर आहेत; मात्र त्यातून मार्ग काढत पुढे जाण्याची क्षमता प्रत्येकाने विकसित केली पाहिजे. मेडल आणि पदवीपेक्षा व्यावहारिक जीवनात आपण कसे वागतो, माणसांशी कसे संबंध ठेवतो आणि परिस्थितीला कसे सामोरे जातो, याला अधिक महत्त्व आहे." विद्यार्थ्यांनी काळानुसार नवनवीन ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले. जग वेगाने बदलत असून त्या वेगाने पुढे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:मध्येही सातत्याने बदल घडवून आणला पाहिजे. बाहेरील जगात वावरताना आपली उद्दिष्टे निश्चित करणे आणि त्या दिशेने सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.जीवनात पुढे जाण्यासाठी कौशल्यविकासासोबत संशोधनवृत्ती आणि विकासाची दृष्टी जोपासली पाहिजे. 'Skill – Researcher – Developer' हा त्रिकोण पूर्ण करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी विशेष अतिथी डॉ. विजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, पदवी प्राप्त केल्यानंतर केवळ नोकरी किंवा करिअरच्या मागे न लागता समाजात स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करावा तसेच महाविद्यालयीन शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग स्वत:च्या प्रगतीसोबतच समाजाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर यांनी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केला. त्यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे संस्कार आणि मूल्ये जपत समाजात आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. एल. सावंत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे यांनी केले.पदवीदान समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कालिकादेवी विद्यालयात 'श्री कालिका पॅटर्न परीक्षा' संपन्न...



**शिरूर कासार :**आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे,विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दरवर्षी राबविण्यात येत असलेला 'श्री कालिका गुणवत्ता पॅटर्न' यानुसार चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ५ वी ते १२ वी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची आणि सर्वच विषयाची 'श्रीकालिका पॅटर्नची परीक्षा' घेण्यात आली.आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रामध्ये गुणवत्ता चाचणी परीक्षा घेतली जाते.अशा विविध क्षेत्रात घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेला विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागते.त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता एक दूर दृष्टिकोन लक्षात घेऊन भविष्यात सीईटी, जेईई, नीट, नर्सिंग, आयसर, बाल वैज्ञानिक, डिप्पर, ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती,सैन्य भरती, पोलीस भरती तसेच पदवीनंतर अभ्यासक्रमासाठीची सीईटी, सेट-नेट, पेट, टीईटी, पीएच.डी.,एमपीएससी, यूपीएससी, आयपीएस, आयएएस इत्यादी स्पर्धा परीक्षेच्या धरतीवर 'श्री कालिका पॅटर्न'ची परीक्षा घेतली जाते.गेल्या वर्षी या उपक्रमामुळे शिरूर तालुक्यात व पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक झाले.विद्यार्थ्यांनी पण विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविले.त्यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचा विभागीय पातळीवर लौकिक वाढत गेला.म्हणून यावर्षी प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांना शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित पहिली 'श्री कालिका पॅटर्नची परीक्षा' प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या निरीक्षणाखाली सुरळीत पार पडली.या परीक्षेतून गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात येणार आहेत.या परीक्षेसाठी विद्यालयातील उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, परीक्षा प्रमुख, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, विषय शिक्षक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.


## आप्ताची केमिस्ट्री

( मधुबानंदा प्रधान)
*काही आप्त*
मौल्यवान ,
प्लॅटिनम,सोन्या ,चांदिसारखी.
*काही आप्त*
रेडिओॲक्टव्ह किरणोत्सारी.
जीवनाला प्रकाशमय करणारी.
*काही आप्त*
कॅलशीयम,मॅग्नेशियम ,सोडियम
हाडास,तारक तर काही मारक.
*काही आप्त*
अर्थ मेटल, काही लॅत्थेनाईड
काही इंनरट गॅस,पाऱ्यासंम जड.
*काही आप्त*
आवर्त सांरनीतील ग्रुप.
क्रियाशील प्रेरक अल्कलिॲसिडिक .
*काही आप्त*
सॉफ्ट तर काहीजण हार्ड वॉटर
काही मोल्युक्युलार , ओरबिटल
थियरीत कक्षेत स्थिराविनारे.
*काही आप्त*
केमिकल आयोनिक बॉण्ड नाते.
,ज्वालाग्रही, फॉस्फरस
सोडियम.
जीवनदायी, प्राणदायी
हायड्रोजन ऑक्सिजन.
*काही आप्त*
रसायनातील अदृश्य बंधने,आयनिक
सहसंयुगी मनाची स्पदने.
*काही आप्त*
नायट्रोजन
कार्बनसारखी,
लोखंडासारखी
तांब्यासारखी,
*काही आप्त*
विघळणाऱ्या क्षारासारखी
काहित,आवर्तन सारणी गुण.
प्रत्येकाची वेगळी ओळख,अभिक्रिया
कोणी चंचल,
कोणी स्थिर निऑन .
कोणी हिरा,कोणी कार्बन
*काही आप्त*
कष्टाच्या अग्निदिव्यातून
पोलाद .
समर्पणाच्या उष्णतेन .
बावनकुशी
पिवळधमक सोन.
सुखदुख् आभिक्रियेत
येणारे जाणारे
परीपक्व.
व्यसन चक्राच्या
प्रयोगशाळेत
स्वार्थी,आर्सेनिक,
विषारी सायनाईड.
*कोणी आप्त*
नात्याच्या बंधनानी समृध्द .
बाबासाहेबांच्या दूरदृष्टीने
साकारलेल्या
आवर्त सारणीतील
जीवन तारक खनिज
,सात्विक मुलद्रव्य
रसायनानी उजळलेले.
धम्माचे अनुकरणीय .
निस्वार्थी वाहक .
*कोणी आप्त*
,गोड ओजस्वी वाणी ,
नारळाचं गोड पाणी
निसर्गनियम ,
शेवटी माती ,पाणी ,
अग्नी वायू संयोजन
विरजण, कूजन
कुशल कर्म आयोजन.
जीवनी नियोजन.
*आप्त केमिस्ट्री*
एक जीवन.


**मधुबानंदा प्रधान**
**सेवानिवृत्त वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ**
**अकोला. ९४२१७१९९१७**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६

# वाळूवरची अक्षरे - स्त्रीयांच्या व्यथांग वेदनांची कथा




कवी कथाकार एक सृजनशील स्नेहाळू स्नेही सन्मित्र सुरेश पाचकवडे जी यांचा 'वाळूवरची अक्षरे' हा ज्ञानपथ प्रकाशक श्री सुनील सुकलकर यांनी अतिशय देखणी कलाकृती केली आहे.बुध्दभूषण साळवे यांचे आशय संपन्न सृजन समर्पक मुखपृष्ठ.यात एकूण सोळा कथा."आपल्या सर्वांचं आयुष्य वाळूच्या अक्षरांसारखं असतं.आपल्यातही नकळत कधी काळाची झुळूक येईल,आणि या अक्षरांचं अस्तित्व पुसून टाकेल याचा काही नेम नसतो.पण आपण जे जगतो ते क्षण मौलिक असतात.नियतीनं सर्वांच्या आयुष्याच्या वाळूवर कोरलेल्या सुस्वरूप जीवनाक्षरांना"...ही सविनय मनोज्ञ अर्पणपत्रिका.ही कथा लेखकांची मनस्वी ओंजळभर सुखाची फुलं आहेत.लोकमत कथालेखन स्पर्धेत राज्यस्तरीय सर्वप्रथम वाळूवरची अक्षरे.यात अतिशय तरल स्त्री मनाचा भावबंध मांडला आहे.ती,तो अनैतिकसंबंध."जगाच्या समाजाच्या नजरेत चारित्र्यहीन,व्यभिचारी असे आपण...आपला संबंध आहे असे नाही वाटत तुम्हाला?"(पृ.३६)ही दोघं समुद्र किनारी येतात वाळूत तो बोटाने 'दुर्वा'व ती 'अक्षय'अशी ही अक्षरे लिहिते.पती पासून दुर झालेली ही सौंदर्यवती.या समुद्रात जावं तर मृत्यू आणि पतीच्या दारात मृत्यू येणं म्हणजे प्रायश्चित्त मिळणं.म्हणून पापक्षालनासाठी ती पतीचाच मार्ग स्वीकारते.अशी ही स्त्रीचे वेदन सांगणारी कथा आहे.यातअनंत काळाच्या स्त्री भावनेचा पावित्र्य व शील संवर्धनाचा स्त्रीधर्म नैतिक अनैतिकतेचा तरल भाव मांडला आहे.गहिवरून ती त्याला म्हणते मला माझ्या मार्गाने जाऊ दे ती निघून जाते.कथा सारं असा "समुद्रातून एक वेडीपिशी लाट आली आणि वाळूवरची अक्षरे पुसून गेली."(पृ.३९) खरंच स्त्री या सृजन सृष्टीची निर्मिती आहे.आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक भान देऊन जाणारी ही कथा.'मृत्यूस्पर्श'हा अतिशय भावूक जीवन स्पर्श आहे.या कथेतील स्त्री नायिका कांता.ही आत्महत्या करायला निघाली आहे.मुलंबाळ होतंनाही वांझ आहे.नवऱ्याने घरातून हाकलून दिले आहे.ती पुलावरून उडी मारून आत्महत्या करणार तो एक सिद्धहस्त पुरुष तिला या मृत्यूतून प्रवृत्त करतो.स्पर्श न करता एका घनदाट जंगलातील स्मशानात घेऊन येतो.हे जीवनाचे अंतिम सत्य आहे.आपला जीव हा ईश्वराचा अंश आहे.तिला सोडून तो झोपडीत जातो.तिला तहान भूक लागते.तो तिला जे सांगतो ते असे "कांता...! मृत्यू हा जीवनाचा अंत असतो.या अंतातून कुणीच सुटलं नाही.जोवर आपले श्वास आहे.तोवर आपण जगण्याची जिद्द ठेवली पाहिजे.जीवनाची वाट सुखाची असो वा दुःखाची, आपण चाललीच पाहिजे "(पृ.८)हा गुरूमंत्र ही कथा देऊन जाते.एक स्त्रीची अब्रू ही अफाट वेदना आहे.या कथेतील एक अनामिक युगपुरुष जगण्याचे तत्वज्ञान सांगून जाते.आजही स्त्रीयां प्रपंच सोशिक आहे.त्या आत्महत्या करीत नाहीत.त्या जगणं शिकवून जातात.'अंतर्नाद'ही अतिशय तरलं इमेंजीन कथा स्त्रीच्या उदरातील आत्मा बोलतो आईला संकेत देतो.हा अंतर्नाद म्हणजे एक दैवी आत्मानुभूती आहे.'आई कर्णफुल या पर्समध्ये आहे.पप्पांना सहलीला जाऊ देऊ नको अपघात होणार आहे.हे इश्वरी बालसंकेत खरे ठरतात.बाळअंत झाल्यावर मी मनुष्य अवतार होईल.मग मला काहीच संकेत कळणार नाही.अशी ही अंतर्नादाची कथा.मग त्याचं नाव देवांश ठेवतात.'वेडगळ' अपघात होऊन मेंदूला जबरदस्त मार लागतो.मुलाच्या मेंदूवर विपरीतपरिणाम.फुगे,मातृह्दयकडे पाहणे, बायको दे म्हणून हट्ट करणे अशा वेडगळ मागण्या म्हणजे शारीरिक मानसिक घुसमट इथे आहे.त्याला गोळी आहे तोपर्यंत तो चांगला.इथेएका मातृत्वाची अमोघ अशी ही कथा.मुलात सुधारणा झाली पाहिजे.याचे प्रंचड दुःख फक्त आईच सहन करते आणि तीचं तिचे मातृत्व मायेनं ओथंबून येतं अतिशय मनाचा तळ ढवळून काढणारी कथा 'वाटसरु' ही एक मुलीच्या बालमनावर आघात करणारी कथा.शेजरी विधुर मधूकाका आणि आई यांचे अनैतिक संबंध.पुढे त्यांच्याबरोबर निघून जाते.बापाच्या मनावर प्रचंड येऊन ते फक्त झोपून राहतात.एका रात्री तिला आईने कोमल म्हणून हाक मारल्याचा भास होतो.नाही बेटा कुणीतरी वाटसरू असेल.अशी ही मुलीच्या वेदनेची सल उजागर करणारी करणारी कथा व्याकुळ करुन जाते.'जाणीव' ही कथा आजच्या समकालीन पांढरपेशी नोकरी करणारी सून व मुलगा यांच्या जगण्याच्या वास्तवाचे चित्रण या कथेत आहे.सासूने घरची सारी कामे करून नातू सांभाळला पाहिजे.एक मायाळू आजी नातू प्रणवला जीवपाड सांभळते.एक दिवस अचानक हे लेकरू हरवते.ही सृजन थिम मन उद्विग्न करुन जाते.शोधा शोध व सूनेचा प्रंचड त्रागा सहन करीत.सासू गप्प राहते.नातू शेजारच्या खांडेकर बाईने "आज माझ्या श्रीचा वाढदिवस होता, म्हणून मी प्रणवला येथून घेऊन गेले होते.आमच्याकडेचा जेवला हा"(पृ.४७).नातू प्रणव सापडतो.पण आजी म्हणून जी स्त्री जाणीव आहे ती मनात सल करून राहते.अशी ही अस्सल आजच्या शहरीकरणातील रघतपारखेपणाची ही कथा.'उगाच'एकभणंग अवलिया नायक.उंदराचं औषध,नदीत पुलावरून उडी, विजेच्या तारा,याआत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो.यातून तो वाचतो.सखीआई गेली. सावत्र आई आणि सावत्रभाऊ यांचा छळ.बाप नाही.लग्न झालं बायको सुमित्रा मिळाली.सावत्रभाऊ आणि ती एकदिवस गायब झाली.या विरहाची ही कथा.तो घर सोडून जातो.एका अनामिक ठिकाणी सुमित्रा त्याच्या दारात भिकारी अवस्थेत पडलेली दिसते.ही स्त्रीच्या सर्वांगीन सर्वस्वाची राखरांगोळी करणारी इथली आपुलीच माणसं कशी बेइमानीचा खंजीर खुपसणारी आहे.अशी ही संवेदनशील वेदनेची कथा.'समाधी' या कथेत आई आणि एक परका माणूस इथे वासनांध विकृतीने दर्शन मुलगा पाहतो.स्त्रीचं शोषण करणारी पण तिला पती निधनानंतर पुरुषाचा आधार असावा पण लेकरांच्या जीवनात अंधार पडतो.कथेतला मुलगा बोटाला ठेच लागून रक्ताळले तरही दार उघडत नाही.दाराच्या फिटीतून जे दृश्य पाहून घरचं सोडून जातो.ही भंयकर वेदनादायी कथा आहे.इथे स्त्री भावविवश्यतेचे चित्रण नखक्षिकांत आले आहे.'परपुरूष'ही एक युगानुयुगे बाईच्या मनातली भीती.सुखवस्तू घरातील बाई सहलीत आपल्या पती सोबत आहे.तो मात्र नशेत धूंद आहे."चेतन ब्रम्हचारी आहे म्हणून काय झाले.आहे तर पुरुषच आणि माझ्यासाठी परपुरुष."तू ताबडतोब निघून जा येथून."चेतन बाहेर निघून गेला.(पृ.७७) बाईची सत्य सतर्कता महत्वाची कारण तिचे अस्तित्व व शील चारित्र्य सांगणारी कथा.'जन्मोजन्मी'दिपा एक गरीब घरातील मुलगी एक श्रीमंत कुटुंबातील शरद या अर्धांगवायूने पिडीत मुलांबरोबर लग्न.एक तारुण्यसुलभ भावभावनांचा उन्मेष पण विकलांग व्यथेची वेदना.दिपा त्याला सुख देते.पण जन्मोजन्मी हाच पती नको मागुस देवाला.ही कथा दिपाच्या प्रारब्धाची आहे.'होरपळ' एक नितळ श्रेध्दय प्रेमाची होरपळ.वैशूला गैरसमज झालेला.तो देवकी या मतिमंद मुलीवर प्रेम करतो.या कथेचा नायक होरपळून जातो.'प्रेमास्त' हा एक अगम्य भावनेचा ओलावा आहे.पण दोन जीवांच्या प्रेमास्त ही एक भाव व्याकुळ करणारी कथा.'मुक्ती'ही एक सृजनशील मनस्वी असक्ती देणारी कथा."या विवाहाने मुद्रिकाला यांच्या पाशातून मुक्ती मिळत आहे.ह्या मुक्तीचं आपण स्वागत करायला हवं तिला पित्यासमान माझ्याशिवाय कोण आहे?"(पृ१०६)ही व्यथांग स्त्री भावनेच्या उध्वस्त कथा.या व्यवस्थेत स्त्रीयांच्या भावनेचा केलेला वापर केवळ वासनांध विकृतीचा आहे.'शेजारधर्म'सोमनाथ हे एक राजस्थानी गुजराती कुटूंब.त्याची पत्नी गरोदर आहे.ती घरात एकटीच.तिला कळा येताआहेत.शेजारधर्म म्हणून कथानायक आपल्या आईस पाठवतो.दवाखान्यात शरिक करतो.तिला मुलगा होता.ती घुंगट घेऊनच असते.पण ती जेव्हा मराठी बोलते.तेंव्हा पितळ उघडे ओकेपडते.बाई किती बंधनात असते.तिचा कोंडमारा होतो.ही एक मनस्वी कथा.'स्वैराचार' दादाराव रमाबाई हे वाचक मित्र वयस्क.या दादारावची पत्नी त्याला सोडून गेली मुलांकडे राह्यला.कारण "तुमच्या घरच्या मोलकरीना तुम्ही बळजबरीने कवेत धरले होते"(पृ.१२५)हा स्वैराचार आहे.ही साठीनाठीची भंयकराच्या काठावरची कथा.'प्रश्न'ही शेवटची इच्छा शक्तीची प्रेम उपासक कथा.कथेचा नायक लग्न करत नाही.शेवटी बाप एक ताराबाई बिनधास्त घरात घेऊन येतो.आपल्या मुलांच्या मनातून ही पवित्र प्रेमाची ओढ निर्माण करून देता.कथाकार सुरेश पाचकवडे यांचा कथेचा अनुबंध म्हणजे आजच्या समकालीन समाज प्रवाहातील सुशिक्षित अशिक्षित अशी कोणतीही स्त्री,बाईमाणूस असो तिच्या भावभावनांचे मनोज्ञ भावविश्व दाखविले आहे.तिच्या तरलं भाव प्रवाहात ती मुक्त व्यक्त होते.मानपान अपमान यात ती आपल्या केवळ लेकरासाठी जगते.यातील कथन शैली म्हणजे एक सृजनशील आत्मचिंतन आहे.स्त्रीच्या मनाच्या खोल तळाशी असलेला एक सृजन समर्पक स्त्रीभाव म्हणजे बाईपण या कथेतून मर्मग्राही आस्वादक आहे हेच या कथांचे वैशिष्ट्ये.मृत्यूस्पर्श करीत ही कथा मनाचा अंतर्नाद मांडत एक वेडगळ त्याची सल देऊन जाते.या स्त्रीत्वाच्या वाटेवर कफल्लक वाटसरू तिच्या जाणीव जीवनीतून वाळूवरची अक्षरे कोरतो.तो उगाच भावविभोर होऊन मग समाधीस्त होतो.परपुरुष, जन्मोजन्मी तीचं बाईची घुसमट व त्याची होरपळ, शेवटी प्रेमास्त करत मन मुक्ती शोधत शेजारधर्म ही निहाळून पाहतो.पण अजूनही वासनेचा स्वैराचार चालूच आहे.हा शेवटचा 'प्रश्न'कथा सांगून जाते.श्रेध्दय जेष्ठ अभ्यासक, ख्यातनाम समीक्षक डॉ श्रीकांत तिडके लिहितात "स्त्री पुरुष संबधाचे नवे आयाम आणखी काही कथांमध्ये आले आहेत.विवाहसंस्था आणि बदलते कौटुंबिक जीवन यांचे नवे प्रश्न,नवी आव्हाने उभी करताहेत.'वाळूवरची अक्षरे "परपुरुष' ह्या कथा बदलत्या वास्तवाकडे नेतात.लेखकाच्या मनातील सन्मूल्यावरील विश्वास कायम आहे.स्त्री-पुरूष संबंध म्हणजे 'शिवशक्तीचा' विलास आहे.हे भाव जीवन पुन्हा समृद्ध होण्याचा आशावाद ह्या कथांमध्ये आहे.(पाठराखण) अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन समर्पक समृद्ध चिंतन या समीक्षणातून आले आहे.अनादिअंनत स्त्रीत्वाचे मातृत्व हे आदिम सत्य तर आहेच पण तिची व्यथांग वेदनांची व्याप्ती अद्वैत शक्तीची आहे.असा संपूर्ण सम्यक सारं या कथा देऊन जातात.कथालेखनाची भाषा शैली ही चिंतनशील प्रवृत्तीची असल्याने संस्कृती संस्कार शिदोरी व मुल्यसंवर्धन हे सर्वश्रेष्ठ या कथांचे आहे.मनस्वु हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक:-वाळूवरची अक्षरे (कथासंग्रह)लेखक:-सुरेश पाचकवडे प्रकाशन:-ज्ञानपथ पब्लिकेशन सुनील सुकलकरमुखपृष्ठ संकल्पना:- डॉ विनय दांदळे अकोला मुखपृष्ठ:- बुध्दभूषण साळवे, नाशिक प्रथमावृती:- २९जुलै २०२६(गुरुपौर्णिमा)किंमत:-२१०/रूपये पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना संवाद:- ९९७५१३७३३७**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६


## दप्तर मुक्त शनिवारी 'कवी मनोज खुटे विद्यार्थ्यांच्या भेटीला!




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद शाळा धोपटेश्वर वाडी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे शनिवारी, दिनांक ८ ऑगस्ट रोजी ,दप्तर मुक्त शनिवार निमित्ताने 'कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला' या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते. शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार ढाकरे यांनी प्रास्ताविक केले.'कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला' या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत 'बाप पेरतो रगत' या कवितासंग्रहाचे कवी मनोज खुटे यांनी 'मला दप्तर घेऊन दे' गाणे विज्ञानाचे, दिवा वंशाचा, महिमा आईचा, शहीद यासारख्या एकापेक्षा एक विद्यार्थ्यांच्या बालमनावर सुसंस्कार करणाऱ्या व शैक्षणिक मूल्य जोपासणाऱ्या कविता सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली.खाऊ नको, पैसे नको मला दप्तर घेऊन दे, ज्ञानाच्या मंदिरात मला आनंदाने जाऊ दे. फटाके नको, कंदील नको मला शिक्षण घेऊ दे. ज्ञानाच्या दिव्याने सारे घर मला उजळू दे. 'मला दप्तर घेऊन दे' या कवितेतून शिक्षणाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.आई मला जन्म घेऊ दे, तुझ्या सारखे मला जग पाहू दे.छाटू नको गर्भात नाळ माझी, आयुष्यभर सेवा करील गं तुझी.डोई माझ्या तुझा मायेचा हात असू दे,नारीशक्तीचा सूर्य पृथ्वीवर उगवू दे. 'दिवा वंशाचा' या कवितेतून त्यांनी स्त्री भ्रूणहत्यावर प्रचंड प्रहार केला.विज्ञानाच्या वाटेवरती सदा चालत राहू, मानवाच्या हिताचे शोध आम्ही लावू. नाते विज्ञानाशी जुळून घेऊ, गाणे विज्ञानाचे आनंदाने गाऊ.'गाणे विज्ञानाचे'या कवितेतून मनोज खुटे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा यासाठी या कवितेचा जन्म झालेला आहे असे आवर्जून सांगितले. आपल्या अवतीभवतीचा परिसर,निसर्ग, शेती माती, झाडे फुले, शेती व शेतकरी बाप या सर्वांचं कवी निरीक्षण करतो. या निरीक्षणातून व वेदनेतून कविता जन्माला येते. 'कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला' या नावीन्यपूर्ण उपक्रमातून भविष्यात अनेक विद्यार्थ्यांमध्ये कवी, लेखक जन्माला येतील असे प्रतिपादन कवी मनोज खुटे यांनी केले.सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार ढाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षक रोठे यांनी मानले.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903


## महाडिकांची सतेज पाटलांशी भेट; जुन्या आठवणींना उजाळा



**कोल्हापूर :** पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या दुःखद निधनानंतर सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून भाजप खासदार धनंजय महाडिक यांनी आमदार सतेज पाटील यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. एकेकाळी संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेत असलेली या दोन नेत्यांची घट्ट मैत्री 2012 नंतर संपुष्टात आली होती आणि तेव्हापासून त्यांच्यात तीव्र राजकीय वैर निर्माण होऊन त्यांनी अनेक सार्वजनिक व्यासपीठांवर एकमेकांविरोधात टोकाची भूमिका घेतली होती. मात्र, या कठीण आणि दुःखाच्या प्रसंगी जुने राजकीय वाद विसरून खासदार महाडिक यांनी घेतलेली ही सांत्वनपर भेट राजकीय वर्तुळात प्रगल्भतेचे दर्शन घडवणारी आणि विशेष लक्षवेधी ठरली आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनानंतर सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून, खासदार धनंजय महाडिक यांनी पत्नी अरुंधती महाडिक यांच्यासह कसबा बावडा येथे जाऊन पाटील कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. आमदार सतेज पाटील आणि डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती संजय पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनी या दुःखद प्रसंगी कुटुंबीयांना धीर दिला. यावेळी संवाद साधताना खासदार महाडिक यांनी दिवंगत डॉ. डी. वाय. पाटील यांच्यासोबतच्या आपल्या जुन्या आणि जिव्हाळ्याच्या आठवणींना उजाळा दिला.

या सांत्वनपर भेटीदरम्यान खासदार धनंजय महाडिक यांनी डॉ. डी. वाय. पाटील यांच्यासोबतच्या एका खास आठवणीला उजाळा दिला. 2004 च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर डॉ. पाटील यांनी आपल्याला, 'पराभवाने खचून जाऊ नकोस, पुढे नक्की यश मिळेल,' असा मोलाचा सल्ला देत धीर दिला होता. त्यांच्या याच शब्दांमुळे प्रेरणा घेऊन 2014 मध्ये आपण खासदार झालो, अशी कृतज्ञता महाडिक यांनी व्यक्त केली. यासोबतच, आमदार सतेज पाटील आणि संजय पाटील हे डॉ. डी. वाय. पाटील यांचे दोन्ही सुपुत्र अत्यंत कर्तृत्ववान असल्याचाही उल्लेख त्यांनी यावेळी आवर्जून केला.

अनेकांना जगण्याचे बळ देणाऱ्या, हजारो कुटुंबांना आधार देणाऱ्या आणि देशाच्या शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या शिक्षणमहर्षी, ज्ञानतपस्वी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना अखेरचा निरोप देण्यासाठी कोल्हापुरात अक्षरशः जनसागर लोटला होता. कसबा बावडा येथील 'यशवंत' निवासस्थानाहून फुलांनी सजवलेल्या वाहनातून त्यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा काढण्यात आली. आपल्या या लाडक्या लोकनेत्याचे अंतिम दर्शन घेण्यासाठी आणि त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने या अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. 'अमर रहे, अमर रहे... डी. वाय. दादा अमर रहे' या घोषणांनी परिसरातील वातावरण अत्यंत भावूक झाले होते.

अंत्ययात्रा पॅव्हेलियन मैदान येथे पोहोचल्यानंतर पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात आणि शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तिरंग्यात लपेटलेल्या त्यांच्या पार्थिवाला पोलिस पथकाने हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. अत्यंत विद्वान, कर्तृत्ववान आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व असलेल्या सर्वांच्या लाडक्या 'डी. वाय. दादां'ना निरोप देताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते. लाखो नागरिकांच्या साश्रुनयनांच्या साक्षीने हे महान व्यक्तिमत्त्व अखेर अनंतात विलीन झाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६


# आदिवासींना चिघळून तोडते भूक...अन् फाडते पोटाची लक्तरे...!

आजच्या या स्वातंत्र्य भारतामध्ये न्यूजपेपर मधून बातम्या वाचण्यात येतात. नाशिक, नगर, नंदुरबार,अशा विविध ठिकाणी राहणाऱ्या आदिवासीयांना अजूनही पोटाच्या भाकरीसाठी स्वत:च्या मुलांना विकावं लागतं. आदिवासीयांकडून वेठबिगारी केली जाते. वेठबिगारी-कामाधंद्याचा पुरेपुर मोबदला न देता, त्यांच्याकडून जुलूम-जबरदस्तीने काम करुन घेऊन त्यांचे शोषण करुन घेणे. त्यांच्या अज्ञानाचा आणि दुबळेपणाचा फायदा घेऊन, कवडी मोलाच्या मोबदल्यात हवी ती कामे त्यांच्या इच्छेविरुद्ध जाऊन त्यांना धमकावून त्यांच्याकडून बळजबरीने कामे करुन घेतली जाते म्हणजेच वेठबिगारी होय. आज जणू आदिवासी म्हणजे अश्मयुगीन काळातला माणूस वाटायला लागलाय. मानवाच्या उत्पत्तीपासून माणसात बदल होत गेला. गावांची शहरं झाली. माणसं वेगवेगळ्या ग्रहांवर जायला लागली. अनपेक्षित बदल झाले. गरिबीही घटत आली. तरीही अजूनही आमचा एक भाऊ जंगलातच भटकंती करतोय. आजही तो त्याच अश्मयुगीन जीवन जगतोय. जंगलात राहून पोटाच्या भुकेसाठीच भांडतोय. अजूनही त्याचं गाव जंगलच आहे. या स्वतंत्र भारतात अजूनही शहरांसारख्या सुख-सुविधा आदिवासींच्या अश्मयुगात आजपर्यंत पोहोचल्या नाही म्हणायच्या... तुटक-तुटक घरांची रचना अजूनही बदलली नाही. अजूनही आमचा आदिवासी या आधुनिक जगाचा हिस्सा बनला नाही. या महासत्ताक होऊ पाहणाऱ्या आपल्या या भारत देशाच्या विकसित विज्ञानयुगापासून आमचा आदिवासी अजूनही वंचित आहे म्हणायचा... अजूनही आमच्या आदिवासी भावांना असं वाटतंय. माणसाच्या विकासाचा आणि माणसातल्या माणुसकीच्या दुनियेचा शोध अजून लागायचा बाकी आहे. त्या शोधानंतर आपल्याला चांगले दिवस पाहायला, भोगायला मिळतील, या आशेवर तो बिचारा आशा धरुन विकसित माणसाचा शोध लागणार आणि आपलं जीवन बदलणार, अश्या या भंटकंतीच्या प्रवासातून मुक्त होणार आहो. अशी भाबडी आशा धरुन बसला आहे. त्यांना काय माहीत, तो शोध कधीचा लागलाय म्हणून; पण तो शोध तुमच्यापर्यंत राजकीय लोकांनी, देशाच्या सरकारने पोहोचवलाच नाही. तुम्हांला त्यांनी धर्मभ्रष्ट, नक्षलवादी, देशद्रोही असे अनेक आरोप लावून, वेठबिगारी केलय. इयत्ता तिसरीच्या माणसाची गोष्ट या इतिहासाच्या पुस्तकाच अश्मयुगीन माणसाचं कवर लावून तुम्हाला अश्मयुगीन काळातच ठेवलय... आजचा आदिवासी माणूस खरंच इयत्ता तिसरीच्या इतिहासातलाच झाल्यासारखा आहे, अंगावर कपडे नाही. लिहिता-वाचता येत नाही. घरेही जंगलातल्या पालापाचोळ्यात शेणामातीतं लिपलेली. शहरांची सोडा गावांचीही रचना त्यांच्या भागाला नाही. कोण कुठं कोण कुठं राहतो. हेही समजायला तयार नाही. अजूनही आदिवासी माणसं माणसांसोबत कमी आणि जंगली प्राण्यांसोबत जास्त राहतात. त्यांचा बाकी जगाशी काहीच संपर्क नाही. कोण, कुठून, कोठे, काय, कसा, कशाला या कोणत्याच प्रश्नांचे उत्तर या आदिवासींयांना ठाऊक नाही. आज आम्ही रोबोटमध्ये जीव कसा आणता येईल. याचं संशोधन करतोय. पण आदिवासींना जंगलाच्या बाहेर कसं आणता येईल याचा शोधच अजून लागला नाही म्हणायचा... आमचं आदिवासी संशोधन जवळजवळ शून्यातच खेळतंय म्हणायचं... भारतीय आदिवासीयांना वाटू द्या. तेही या भारत देशाचे नागरिक आहे. त्यांच्याकडेही नागरिकत्व आहे. त्यांनाही त्यांच्या हक्कासाठी लढणारा माणूस निवडता येतो. आणि त्यांचे हक्क त्यांना मिळतात. एवढं तरी त्यांच्यापर्यंत पोहोचवू द्या. त्यांनाही जगाचे शोध, जगाच्या घडामोडी कळू द्या. त्यांनाही आपण अश्मयुगात नाही, तर आधुनिक युगात राहतोय, याची जाणीव होऊ द्या. त्यांनाही उंच-उंच इमारती पाहू द्या..! उडतं विमान पाहू द्या..! मोठं-मोठ्या धावणाऱ्या गाड्या पाहू द्या...! त्यांनाही संगणक, स्मार्टफोन वापरुन पाहू द्या...! त्यांनाही पुस्तकं वाचून पाहू द्या.! त्यांनाही नोकऱ्या करताना पाहू द्या..! त्यांनाही उद्योजक म्हणून समाजात वावरताना पाहू द्या ..! त्यांनाही मोठं-मोठ्या शहरांत मोठं-मोठ्या घरांत राहताना पाहू द्या..! त्यांचंही घर फर्निचरनी भरलेलं पाहू द्या..! त्यांनाही मोठं-मोठ्या गाड्यांत फिरताना पाहू द्या..! त्यांनाही, सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर, आमदार, खासदार, मंत्री, राष्ट्रपती, पंतप्रधान होताना पाहू द्या..! त्यांनाही आपण या जगाचा, मानवतेचा अविभाज्य हिस्सा आहोत, हे त्यांना कळू द्या..!माणसाचं लेकरु आहे. माणसातच वाढू द्या..! या भारतीय समाजात त्यालाही माणसाचं स्थान मिळू द्या. जगाच्या सुख-सुविधांचा लाभ त्यांच्याही नशिबी येऊ द्या. आजच्या या आधुनिक जगात आदिवासी समाज अजूनही पोटाच्या भाकरीसाठी लढताना दिसतोय. कोणत्याच सुख-सुविधा न मागता, फक्त पोटाला भाकर मागणारा आदिवासी त्याचे हे इतकंस जीवनविश्व मानून जगतोय. अजूनही या आधुनिक जगात स्वता:भोवतीच्या वर्तुळाएवढ्या जगात आपलं जीवन जगतांना दिसतोय. पोटात कुळकुळणाऱ्या भुकेला भागवण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार होतोय. देवाने ज्या धर्मात, संस्कृतीत जन्माला घातलं, तो धर्महीं आता तो बदलायला तयार होतोय. मिळेल ते काम करायला तयार होतोय. ते काम चांगलं की वाईट याच्याशी त्याला काही घेणं-देणं नाही. तो फक्त आपल्या भाकरीसाठी, आपल्या अस्तित्वासाठी झटताना दिसतोय. अशा या जीवाला जीवदान मिळालं पाहिजे. त्याच्या हक्काची, माणूस म्हणून स्वतंत्र ओळख त्याला मिळाली पाहिजे. त्यालाही या आधुनिक काळात जगण्याचा अधिकार दिला पाहिजे. त्यांची जंगलं विकसित नगरे झाली पाहिजे. तिथेही शहर निर्माण झाली पाहिजे. तोही शहराचा भाग झाला पाहिजे. आधुनिक युगाचा नागरिक झाला पाहिजे. हे सर्व बदल घडून यावे यासाठी आपल्या आदिवासी भावासाठी मला सरकारसमोर लोटांगण घालावंसं वाटतं. काही दिवसांपूर्वी लोकसत्ता या पेपरमधून वाचण्यात आलं. आदिवासी लोकांनी पोटाच्या भाकरीसाठी स्वत:ची मुलं विकली. आज त्यालाही प्रश्न आहे. तो माणूस आहे की नाही. बाकी गोष्टी तर त्यांच्या समजण्यापलीकडच्या आहे. फक्त भाकरीसाठी आपल्यातला माणूस जंगलात भटकतोय. भाकरीसाठी तो सांगेल ती कामे करायला तयार आहे. त्यांच्याकडे सगळ्यांचंच दुर्लक्ष आहे. आजच्या या काळातही त्यांना सरकारी सुख-सुविधा तर दूरच; त्यांचा मूलभूत सुविधाही त्यांना नाही. पिण्यासाठी पाणी, पोटासाठी रोजीरोटी नाही. रस्ते नाही, शाळा, दवाखाने नाही. या भौतिक सुविधा तर दूरच; आधी त्याला माणूस म्हणून जवळ करायलाही कुणी तयार नाही. आजच्या या आधुनिक काळात कधी-कधी असे वाटायला लागले की, एक दरवाजा अश्मयुगाचा आणि दुसरा दरवाजा आधुनिक युगाचा. आजच्या युगातला आदिवासी समाज पाहिला की जणू अश्मयुगात गेल्यासारखं वाटतं; आणि तंत्रज्ञानाने झपाटलेल्या या विज्ञानयुगाकडे पाहिले की हे आधुनिक युग दिसते. कधी जागेपणी, तर कधी स्वप्नात जगत असल्यासारखे वाटते. नगण्य आदिवासी समाज आज फक्त शिक्षित झाल्यामुळे जंगल सोडून शहराकडे वळले आहे. आणि त्यांच्या शिक्षणामुळे त्यांनी त्यांची स्वत:ची गावं उभी केली आहे. त्यांनीही त्याच्या जीवनशैलीत बदल केला आहे. ते या बदलत्या युगात आपलं अस्तित्व निर्माण करत त्यांच्या हक्काचं, कायद्याने हिसकावून घेण्याचा पुढाकार हळूहळू घेत आहे. बाकीच्या हक्कांच काय जे आज त्यांच्यापर्यंत अजून पोहोचले नाही. मग त्या सरकारी योजना असो वा सरकार असो..! आमच्यात मिळून-मिसळून राहताना ,कामेधंदे करतांना, एकत्रित जेवतांना आमचा आदिवासी भाऊ आम्हांला केव्हा दिसेल आमचे आदिवासी बंधू-भगिनी या महान भारत देशाच्या सर्व जात-धर्म पंथ, समभावात माझा आदिवासी आम्हांला सापडेल का? तो जंगलं सोडून, गावात, शहरात, सापडेल का..? तोही सगळ्यांसारखा, अंगभर कपडे घातलेला, सोशल मीडियावर झळकणारा, बर्गर, पिझ्झा खाणारा, शहराची भाषा बोलणारा, हक्कासाठी भांडणारा, संविधान माझ्यासाठी असा म्हणणारा, मोठं-मोठ्या शाळा, महाविद्यालयांत जाणारा, रेल्वे, विमानात बसणारा, अख्खं जग मनमुक्तपणे फिरणारा, नोकरी, व्यवसाय, करता-करवणारा, स्वत:च्या मर्जीने स्वतंत्र भारतात, आपल्या देशात माया मातीत या तंत्रज्ञानासोबत जगणारा आदिवासी आम्हांला या आधुनिक, तंत्रज्ञान-विकसित विज्ञानयुगातला हा नवा अविष्कार या स्वातंत्र्य भारतात बघायला मिळेल का.? सत्ताधाऱ्यांनो एकदा आदिवासींच्या पाड्यांवर चक्कर मारा. आदिवासींच्या झोपडीत एकदा विसाव्याला थांबून पहा. त्यांचं म्हणून त्यांच्याजवळ एकदा बसून त्यांच्या भावना एकदा जाणून घ्या..! तरी..! कळेल आपल्याला, काय हा माणसाचा जन्म रे..! कोणत्या जन्माची शिक्षा देव त्यांना भोगायला लावतो रे...! घरात त्यांच्या झोपायला जागा कमी अख्ख्या घरात धान्य साठवायला मातीच्या कोठ्या असतात. शेणामातीनं लिपलेल्या मातीच्या कोठ्या घरात रचलेल्या असतात. पाण्या-पावसात ,थंडी-वाऱ्यात ,उन्हा-तान्हात. बारक्या-बारक्या लेकऱ्यांना घेऊन कच्चं-पच्चं खाऊन उघड्यावर झोपताना होणारा त्रास उघड्या डोळ्यांनी पाहा हो..!आणि खरच त्यांचा त्रास उघड्या डोळ्यांनी पाहा हो..!आणि समजून घेऊन आदिवासींयांची नोंद वनविभागाच्या प्राण्यांच्या नोंदवह्यासारखी आदिवासी "एवढे शिल्लक" अशी त्यांची प्राण्यांच्या गिनतीत त्यांची नोंद नसावी; ते या देशाचा भाग आहे. भारत देशाचे नागरिक आहे. म्हणून लोकसंख्येच्या जनगणनेत त्यांची नोंद असावी..! सन्मानाने जगासमोर त्यांची माणूस म्हणून ओळख असावी..!


**लेखक-लक्ष्मण गं. वाल्डे, कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं-8888606068**









# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ ऑगस्ट २०२६


## जागतिक आदिवासी दिन : अस्मिता, संस्कृती आणि विकासाचा संकल्प डॉ.वनमाला तडवी..

“जल, जंगल आणि जमीन यांचे जतन करणारी, निसर्गाशी नाळ जपणारी जमात म्हणजे आदिवासी जमात.” आदिवासी समाज हा आपल्या देशाच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि नैसर्गिक वारशाचा अविभाज्य घटक आहे. साधेपणा, प्रामाणिकपणा, परिश्रम, निसर्गप्रेम आणि सामूहिक जीवनशैली ही त्यांची खरी ओळख आहे. शतकानुशतके जंगल, पर्वत, नद्या, वनस्पती, प्राणी आणि पर्यावरणाचे संरक्षण करत त्यांनी मानवाला निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्याचा मार्ग दाखवला आहे. जगातील अनेक देशांमध्ये आदिवासी समाज त्या-त्या प्रदेशाचा मूळ रहिवासी म्हणून ओळखला जातो. भारतातील विविध आदिवासी जमातींनीही आपली स्वतंत्र सांस्कृतिक ओळख जपली आहे. लोककला, लोकसाहित्य, नृत्य, संगीत, सण-उत्सव, विवाहपद्धती, लोकवाद्ये, लोकगीते, वेशभूषा, श्रद्धा आणि सामाजिक परंपरा यांतून त्यांची समृद्ध संस्कृती व्यक्त होते. मौखिक परंपरेतून इतिहास आणि पारंपरिक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आले आहे. दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस ‘जागतिक आदिवासी दिन’ म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने जगभरातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी १९८२ मध्ये आदिवासी लोकांच्या प्रश्नांसाठी कार्यगटाची स्थापना केली. त्यानंतर २३ डिसेंबर १९९४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश आदिवासी समाजाच्या मानवी व मूलभूत हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांची सांस्कृतिक ओळख, भाषा, परंपरा, जीवनपद्धती आणि ज्ञानसंपदा यांचे जतन करणे तसेच विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे हा आहे. भारताच्या सांस्कृतिक विविधतेत आणि पर्यावरणीय समृद्धीत आदिवासी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जैवविविधतेचे संरक्षण, जलसंधारण, वनव्यवस्थापन आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर याबाबत त्यांच्याकडे असलेले पारंपरिक ज्ञान आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक ठरू शकते. जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या काळात आदिवासी समाज अनेक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय बदलांना सामोरे जात आहे. विकासाच्या नावाखाली होणारे विस्थापन, जंगलांवरील निर्बंध, पारंपरिक व्यवसायांवर होणारा परिणाम, शिक्षण व आरोग्य सुविधांची कमतरता, रोजगाराचे प्रश्न, वनहक्क, हवामान बदल, डिजिटल दरी आणि सामाजिक न्याय यांसारखी अनेक आव्हाने आजही कायम आहेत. त्यामुळे आदिवासी विकासाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्टीनेही पाहणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रक्रियेत त्यांच्या हक्कांचा आणि सांस्कृतिक अस्मितेचा सन्मान राखला गेला पाहिजे. त्याचबरोबर बदलत्या जीवनशैलीमुळे आदिवासींच्या सांस्कृतिक ओळखीसमोरही नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. स्थानिक बोलीभाषा, लोकगीते, लोककथा, पारंपरिक ज्ञान, कथाकथनाच्या पद्धती आणि काही सामाजिक परंपरा हळूहळू मागे पडत आहेत. नव्या पिढीला आपल्या इतिहासाची आणि सांस्कृतिक वारशाची पुरेशी माहिती नसल्याची चिंताही व्यक्त केली जाते. म्हणूनच जागतिक आदिवासी दिनाचे स्वरूप केवळ मिरवणुका, पारंपरिक नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये. हा दिवस समाजासाठी आत्मपरीक्षणाचा, जागृतीचा आणि भविष्याची दिशा निश्चित करण्याचा दिवस ठरला पाहिजे. आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना आजही गुणवत्तापूर्ण शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वाहतुकीची अपुरी व्यवस्था, वसतिगृहांची कमतरता, डिजिटल सुविधांचा अभाव, आर्थिक अडचणी आणि योग्य मार्गदर्शन न मिळणे या समस्या विशेषतः उच्च शिक्षणाच्या स्तरावर अधिक जाणवतात. त्यामुळे जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने युवकांसाठी करिअर मार्गदर्शन, शिष्यवृत्तीविषयक माहिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि डिजिटल शिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून नव्या पिढीला आधुनिक जगातील संधी उपलब्ध करून देतानाच आपल्या इतिहासाची, भाषेची आणि संस्कृतीची जाणीवही करून दिली पाहिजे. आदिवासी समाजाच्या प्रगतीत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः भिल्ल समाजासह विविध आदिवासी समुदायांमध्ये शेती, घर, कुटुंब, लोकसंस्कृती आणि पारंपरिक ज्ञानाचे जतन करण्यात महिलांचे योगदान मोठे आहे. मात्र महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत अधिक संधी मिळणे आवश्यक आहे. जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमांमध्ये महिलांना केवळ सांस्कृतिक सादरीकरणापुरते मर्यादित न ठेवता त्यांना आपले विचार मांडण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी स्थानिक पातळीवर ठोस प्रयत्नांची गरज आहे. भिल्ल लोकगीते, लोककथा, पारंपरिक नृत्य, लोकवाद्ये, बोलीभाषा तसेच ज्येष्ठ नागरिकांकडे असलेल्या मौखिक इतिहासाचे डिजिटल दस्तऐवजीकरण केले जाऊ शकते. त्यामुळे ही मौल्यवान सांस्कृतिक संपदा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे शक्य होईल. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये स्थानिक आदिवासी इतिहास, संस्कृती आणि परंपरांवर व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करता येतील. विद्यार्थ्यांना आपल्या गावातील सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी विविध प्रकल्प देता येतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आदिवासी भाषा, लोककला आणि मौखिक परंपरांचे संवर्धन करता येऊ शकते. जागतिक आदिवासी दिन हा केवळ एका समाजाचा उत्सव नाही, तर विविधतेचा आदर करण्याची शिकवण देणारा दिवस आहे. निसर्गसंपत्तीशी समतोल साधून जगण्याची आदिवासी समाजाची पद्धत आजच्या पर्यावरणीय संकटांच्या काळात संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच या दिवसाचे यश मोठ्या कार्यक्रमांच्या संख्येवर मोजता कामा नये. या निमित्ताने युवकांना आपला इतिहास समजला का, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या संधी मिळाल्या का, महिलांना नेतृत्वाची संधी मिळाली का, आदिवासी भाषा व संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्रयत्न झाले का आणि समाजाला आपल्या घटनात्मक अधिकारांची, वनहक्कांची व ग्रामसभेच्या अधिकारांची माहिती मिळाली का—या प्रश्नांची उत्तरे अधिक महत्त्वाची आहेत. ९ ऑगस्ट हा दिवस केवळ भूतकाळाचा गौरव करण्यापुरता मर्यादित न राहता भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस ठरला पाहिजे. आपल्या सांस्कृतिक अस्मितेचा अभिमान जपत शिक्षण, समान संधी, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि स्वाभिमान यांची सांगड घालणे ही आजची खरी गरज आहे. शासन, समाज, शैक्षणिक संस्था आणि आदिवासी समुदाय यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे साधता येईल. संस्कृतीचे जतन आणि आधुनिक प्रगती यांचा समतोल साधत पुढे जाणे, हाच जागतिक आदिवासी दिनाचा खरा संदेश आणि संकल्प ठरावा.




**डॉ. वनमाला रुपसिंग तडवी,**
**भूगोल विभाग,सहयोगी प्राध्यापक**
**मिलिंद कला महाविद्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**


## जायकवाडी जलाशयाचे जलपूजन : पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते पाणीसमृद्धीचे स्वागत

**पैठण :** यंदाच्या दमदार पावसामुळे जायकवाडी धरणात समाधानकारक जलसाठा निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शनिवारी जायकवाडी धरणाच्या जलसाठ्याचे जलपूजन करण्यात आले. पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या उपस्थितीत झालेल्या या जलपूजन सोहळ्याला लोकप्रतिनिधी तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यावेळी आमदार विलास भुमरे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी, महापौर समीर राजूरकर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, नगरसेविका हर्षदा शिरसाट, भूषण कावसानकर, अधीक्षक अभियंता राजेंद्र धोडपकर, कार्यकारी अभियंता गणेश हासे, तहसीलदार ज्योती पवार, मनोरमा गायकवाड, राजेश कांबळे आदी उपस्थित होते. जायकवाडी धरण हे मराठवाड्याच्या सिंचन, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक गरजांसाठी अत्यंत महत्त्वाचे जलस्त्रोत आहे. यंदा गोदावरी खोऱ्यात झालेल्या दमदार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. जलपूजनानिमित्त धरण परिसरात उपस्थित मान्यवरांनी जायकवाडीच्या जलसाठ्याकडे पाहून समाधान व्यक्त केले. आगामी काळात या पाण्याचे काटेकोर नियोजन करून शेतीसह पिण्याच्या पाण्याची गरज भागविणे आणि उपलब्ध जलसाठ्याचा अधिकाधिक लाभ नागरिकांना मिळवून देण्यावर भर देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. जायकवाडीतील यंदाचा मुबलक जलसाठा हा मराठवाड्यासाठी दिलासादायक ठरणार असून, या पाण्यामुळे आगामी रब्बी हंगामासह विविध पाणीवापराच्या गरजांना मोठा आधार मिळणार आहे.

## अतीकच्या कबरीजवळ मुलाला दफन केले

**प्रयागराज :** अतीक अहमदचा २१ वर्षांचा मुलगा अबानला दफन करण्यात आले आहे. शनिवारी संध्याकाळी ७ वाजता त्याला वडील अतीकच्या कबरीशेजारी दफन करण्यात आले. तिन्ही भाऊ अली, उमर आणि अहजम यांनी अबानला खांदा दिला. जनाज्यात सहभागी होण्यासाठी ५-६ हजार लोक पोहोचले. सुरक्षेसाठी कब्रस्तानच्या आसपास १,००० हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात होते. अबानचा मृतदेह घेऊन त्याचा भाऊ अहजम रडत कब्रस्तानमध्ये पोहोचला. गर्दीही त्याच्या मागे आत घुसण्याचा प्रयत्न करू लागली. पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न केला असता गर्दी अनियंत्रित झाली आणि बॅरिकेडिंग तोडली. यावेळी एका पोलीस कर्मचाऱ्याने २-३ लोकांना बंदुकीच्या दस्त्याने मारले. यानंतरही काही युवक आत जाण्यावर ठाम होते, तेव्हा पोलिसांनी त्यांना चापट मारून हटवले. गर्दी पांगली तेव्हा पोलिसांनी त्यांना पिळवून लावले. आई शाइस्ता परवीन मुलाच्या जनाज्यात सहभागी झाली नाही. ती पती अतीक आणि मुलगा असदच्या जनाज्यातही पोहोचली नव्हती. शाइस्ता २०२३ पासून फरार आहे. अबानचा गुरुवारी रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. अबानला ज्या कसारी-मसारी कब्रस्तानमध्ये दफन करण्यात आले, येथेच त्याचे आजोबा फिरोज अहमद, काका अशरफ आणि भाऊ असद यांच्याही कबरी आहेत.